# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९


दिनांक : ०६/०२/२०२४

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ ९६७ /२०२३-२४

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | वृक्षाचे नाव | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री.रविद्र चंद्रशेखर चिंचनसुरे यांचे २३/०१/२०२४ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | पाम | २५ ते ३० फुट | ०२ | ०७ वर्ष | सदरील झाडे रो हाऊस नं ३५,अगरवाल ग्रीन विलेज,काशिगांव,काशिमीरा येथिल ०२ नग पाम घराच्या गेट जवळ असून गेटची सुरक्षारक्षक भिंतीला तडे गेले आहे.मुळाजवळील ब्लॉक निघाले आहेत व घराच्या मागील बाजूस ०२ नग नारळाची झाडे असून गटाराच्या चेंबर जवळ आहेत. झाडाच्या मुळामुळे गटार ब्लॉक होवू शकते असे अर्जदार यांचे म्हणने आहे.तसेच झाडाच्या झावळयां व नारळ छतावर पडून पत्र्याचे नुकसान होत आहे. त्यामुळे जोराच्या वाऱ्याने झाडे पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| २ | नारळ | २५ ते ३० फुट | ०२ | १० वर्ष | |
| २) श्री. कैलास डी.फुल यांचे दि.२३/०१/२०२४ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | नारळ | ३० ते ३५ फुट | ०१ | १० वर्ष | सदरील झाड बंगला नं ७,रवि विला अंबर प्लाझाच्या मागे विजय पार्क,मिरा रोड (पु.) येथिल असून मोठया प्रमाणात वाढलेले आहे. झाडाखाली खोडाजवळ तडे गेले आहे. तसेच जोराच्या वाऱ्याने झाड हलते,झाडाचे नारळ खाली पडत आहे. सदरील झाडामुळे एका मुलाच्या डोकयावर नारळ पडून मुलाला दुखापत झाली आहे.त्या ठिकाणी शाळेला जाणारी मुले उभी राहतात. सदर झाडाला तडे गेल्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या कारणास्तव सदर झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(योगेश गुणिजन)
सहाय्यक आयुक्त
तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

2024 Sutar Permission